सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.उशिप्र-११२४/प्र.क्र.१९/अतिरिक्त सीईटी अर्ज नोंदणी/१०६०/२०२४ दिनांक:२८/०६/२०२४

## सूचना क्र.१

## महा-बीबीए/बीसीए/बीएमएस/बीबीएम (अतिरिक्त सीईटी)-२०२४ ऑनलाईन अर्ज नोंदणी

**संदर्भ :** क्र.उशिप्र-११२४/प्र.क्र.११/सीईटी-२०२४/१०१९/२०२४ दिनांक:२०/०६/२०२४

उपरोक्त संदर्भांकित दिनांक २०/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये, उमेदवारांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन, शासनाने या कार्यालयास **बीबीए/बीसीए/बीएमएस/बीबीएम** या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अतिरिक्त सीईटी आयोजित करण्यास मान्यता दिली आहे. अतिरीत्क परीक्षेसाठी पुढील प्रमाणे उमेदवार पात्र असतील.

- ज्या उमेदवारांनी दिनांक २९/०५/२०२४ रोजीची परीक्षा दिलेली आहे अशा इच्छुक उमेदवारांना देखील अतिरिक्त परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
- ज्या उमेदवारांनी दिनांक २९/०५/२०२४ रोजीची परीक्षा दिल्यानंतर अतिरिक्त परीक्षेची संधी स्वीकारली आहे. अशा उमेदवारांचे दोन्ही परीक्षांपैकी सर्वात्तम असणारे पर्सेंटाईल प्रवेश प्रक्रियेसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहेत. यासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेवेळी उमेदवारांनी सर्वोत्तम पर्सेंटाईलची गुणपत्रिका संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे आवश्यक राहील.
- अतिरिक्त परीक्षेची निकाल प्रक्रिया देखील पर्सेंटाईल पद्धतीने करण्यात येईल.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत बीबीए/बीसीए/बीएमएस/बीबीएम या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता घेण्यात येणाऱ्या **महा-बीबीए/बीसीए/बीएमएस/बीबीएम (अतिरिक्त सीईटी) २०२४** हि सामाईक प्रवेश परीक्षा महाराष्ट्र राज्यात व इतर राज्यातील परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे.

महा-बीबीए/बीसीए/बीएमएस/बीबीएम (अतिरिक्त सीईटी) २०२४ च्या ऑनलाईन अर्ज भरण्यासाठीचा कालावधी पुढील प्रमाणे :-

| अ. क्र | सामाईक प्रवेश परीक्षेचे नाव | तपशील | नोंदणी कालावधी | सामाईक प्रवेश परीक्षेची तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | **महा-बीबीए/बीसीए/बीएमएस/ बीबीएम (अतिरिक्त सीईटी) २०२४** | संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज नोंदणी व निश्चिती करणे | **२९/०६/२०२४ ते ०३/०७/२०२४** | तारीख निर्धारित वेळेत जाहीर केली जाईल. |

सदर परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम आणि माहिती पुस्तिका राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

**सही/-**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**